Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# Forest Services
## Previous Year Paper
### (Prelims) 03 Apr, 2016

Teachingninja.in

महाराष्ट्र वन सेवा (पूर्व) परीक्षा - 2016
परीक्षा दि. - 3 एप्रिल 2016

# A

**2016**

CODE : **MO7**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

## प्रश्नपुस्तिका

**मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन**

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

Teachingninja.in

1. पुढील शब्दातील तत्सम आणि तद्भव शब्द ओळखा :

(अ) कलश

(ब) कळस

(क) क्लेश

(ड) किळस

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (क) तद्भव (ब) आणि (ड) तत्सम

(2) (अ) आणि (ब) तत्सम (क) आणि (ड) तद्भव

(3) (अ) आणि (क) तत्सम (ब) आणि (ड) तद्भव

(4) (ब) आणि (क) तत्सम (अ) आणि (ड) तद्भव

---

2. पुढीलपैकी 'मिश्रवाक्य' कोणते ? ते सांगा.

(अ) जे चकाकते, ते सोने नसते.

(ब) जे चकाकते, ते सोने असतेच असे नाही.

(क) आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतो.

(ड) आकाशात ढग जमल्यावर मोर नाचतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब) (2) (ब) आणि (क) (3) (अ) आणि (क) (4) (अ) आणि (ड)

---

3. खालील वाक्यातील 'प्रत्यक्ष कर्म' कोणते आहे ? पर्यायी उत्तरांतून योग्य तो पर्याय सांगा.

'आजीने नातीला लाडू दिला.'

(1) आजीने (2) नातीला (3) लाडू (4) दिला

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Teachingninja.in

**4.** पुढील उद्‌गारार्थी वाक्याच्या रूपांतरित केलेल्या वाक्यांपैकी कोणते वाक्य विधानार्थी आहे ?

'केवढी उंच इमारत ही!'

(अ) भलतीच उंच आहे ही इमारत.

(ब) उंचीला भरपूर असलेली ही इमारत आहे.

(क) ही इमारत खूप उंच आहे.

(ड) काय उंची आहे या इमारतीची.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) बरोबर (अ), (क), (ड) चूक (2) (अ) बरोबर (ब), (क), (ड) चूक

(3) (क) बरोबर (ब), (अ), (ड) चूक (4) (ड) बरोबर (अ), (ब), (क) चूक

---

**5.** अचूक अर्थ स्पष्ट करणारा शब्दसमूह निवडा :

चव्हाटा

(1) चार रस्ते एकत्र येतात ती जागा. (2) चकाट्यासाठी असलेली जागा.

(3) ग्रामपंचायतीसाठी असलेली जागा. (4) घरामधील भांडणे सोडविण्यासाठी असलेली जागा.

---

**6.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे पर्यायी उत्तरांतील योग्य उत्तर कोणते ?

शरद आनंदाने रसगुल्ले खातो.

(1) मुख्य उद्देश्य (2) मुख्य विधेय (3) विधेय विस्तार (4) कर्म

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

7. जोडाक्षरात एकच व्यंजन दोनदा येते, तेव्हा त्याला द्वित्व म्हणतात. पुढील द्वित्वातील कोणते शब्द बरोबर आहेत, ते लिहा :

(अ) उज्जयिनी – उज्ञयिनी

(ब) सच्चा – सच्चा

(क) धिक्कार – धिक्कार

(ड) अन्न – अन्न

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ), (ब) बरोबर (क), (ड) चूक

(2) फक्त (क), (ड) बरोबर (अ), (ब) चूक

(3) (अ), (ब), (क), (ड) हे सर्व बरोबर

(4) (अ), (ब), (क), (ड) हे सर्व चूक

---

8. खालील पर्यायी उत्तरांतील 'उद्गारवाचक वाक्य' कोणते ?

(1) कुणी कोडे माझे उकलिल का

(2) अपमान केल्यास कुणाला राग येत नाही

(3) आज गाडीत कोण गर्दी

(4) पाचशे रूपये देखील किती मोठी रक्कम आहे

---

9. पुढीलपैकी संयुक्त स्वर कोणते ?

(अ) आ, ई, ऊ, ओ

(ब) ऊ, ऌ, ई, इ

(क) अ, इ, ई, उ

(ड) ए, ऐ, ओ, औ

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (ब) (3) (क) (4) (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

10. खालील पर्यायातील योग्य शब्द समूह ओळखा :

अबदारखाना

(1) एक प्रकारचे शोभिवंत छत्र (2) बोजड, बेढब

(3) स्वच्छ, गार पाणी ठेवण्याची जागा (4) मुक्त, अनिर्बंध

---

11. 'क्षणभंगूर बाब' या अर्थाचा वाक्प्रचार कोणता ?

(1) पाण्यावरची रेघ (2) सतीचे वाण

(3) अळवावरचे पाणी (4) कत्तलची रात्र

---

12. अधोरेखित शब्दाची जात ओळखा :

'तो तोंड उघडेल तर ना —!'

(1) उद्गारवाचक क्रियाविशेषण अव्यय (2) निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यय

(3) स्थानिक क्रियाविशेषण अव्यय (4) परिणामवाचक क्रियाविशेषण अव्यय

---

13. खालील शब्दाकरिता पर्यायी उत्तरांतील योग्य शब्द समूह कोणता ?

अष्टावधानी

(1) एकाच गोष्टींत एका वेळी लक्ष देणारा. (2) अनेक गोष्टींत सभोवार लक्ष देणारा.

(3) अनेक गोष्टींत एकाच वेळी लक्ष देणारा. (4) आठ दिशांकडे फिरून फिरून पाहणारा.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

14. पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचा शब्द कोणता ?

(1) श्रीमंती (2) शांतता (3) सौंदर्य (4) चांगली

15. क्षमा या शब्दाचा 'समानार्थी शब्द' पुढील चार पर्यायातून शोधून काढा :

(1) अभिनेत्री (2) क्षमस्व (3) पृथ्वी (4) ललना

16. पुढील शब्दातील 'अनेकवचनी' शब्द ओळखा :

(1) फूल (2) मोत्ये (3) मूल (4) जळू

17. खालील शब्दाकरिता पर्यायी उत्तरातील योग्य शब्दसमूह कोणता ?

'आगंतुक'

(1) तिथी वार न ठरवता आलेला. (2) आधीच जन्मलेला.

(3) मागून जन्मलेला. (4) तिथी वार ठरवून आलेला.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

18. सदन, भवन, वदन, निकेतन या शब्दांतील 'घर' या अर्थाशी समानार्थी नसलेला शब्द कोणता ?

(अ) निकेतन

(ब) सदन

(क) वदन

(ड) भवन

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) बरोबर (ड) चूक
(2) (ब), (क), (ड) बरोबर (अ) चूक
(3) (अ), (क), (ड) बरोबर (ब) चूक
(4) वरील एकही पर्याय योग्य नाही

---

19. सुयोग्य शब्दजाती ओळखा :

(अ) सामान्यनाम - शाळा, सोने, दूध, साखर

(ब) विशेषनाम - नलिनी, हरि, हिमालय, गंगा

(क) भाववाचकनाम - कीर्ती, वात्सल्य, वार्धक्य, उड्डाण

(ड) धातुसाधितनाम - कर, वागणे, हसू, देणाऱ्याने

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब)
(2) (अ), (ब) आणि (क)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) वरील सर्व

---

20. खाली दिलेल्या स्पष्टीकरणाच्या अर्थाची म्हण पर्यायी उत्तरांतून शोधा.

'अनुकूलता असूनही तिचा उपयोग करता न येणे.'

(1) गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता.

(2) गाढवाचा गोंधळ नि लाथांचा सुकाळ.

(3) गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी.

(4) गाढवाला गुळाची काय चव ... ?

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**पुढील उतारा वाचून प्र. क्र. 21 ते 25 या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

गेल्या कोजागिरी पौर्णिमेची गोष्ट. बायको माहेरी गेली होती. त्या रात्री म्हणे 'को जागर्ति को जागर्ति – कोण जागा आहे? कोण जागा आहे?' असं विचारत लक्ष्मी संचार करीत असते. जागा असेल त्याला तिचा लाभ होतो. झोपी गेलेल्याला जागं करण्याच्या भानगडीत ती पडत नाही. त्याच्या नशिबी दारिद्र्य ठेवलेलं असतं. केवळ लक्ष्मीच्या लोभानं मी त्या रात्री जागा होतो. डोळे गपागप मिटत होते म्हणून निद्रेला घराबाहेर घालवून लक्ष्मीला (गृहलक्ष्मीला नव्हे) स्वगृही आणण्यासाठी मी स्वतःच गृहत्याग केला आणि निशाचराप्रमाणे मी भटकू लागलो. लक्ष्मी जागृत माणसाच्या शोधात आणि जागृत माणूस लक्ष्मीच्या शोधात असा संचार सुरू झाला.

रस्त्यावर लक्ष्मीची गाठ पडणं शक्य नव्हतं. गाठीभेटीच्या जागा म्हणजे उपाहारगृहातील फॅमिली रूम्स! मी मंडईतील एका प्रसिद्ध उपाहारगृहात शिरलो आणि थेट 'फॅमिली रूम' मध्ये घुसलो. पोऱ्या डोळं फाडून माझ्याकडे पाहू लागला. 'लक्ष्मी आ रही है, एक मसाला दूध लाना' मी ऑर्डर दिली. त्याचं समाधान झालं. टेबलावर केशरी कप आला. दुधात भरपूर वेलची घातल्यासारखं दिसलं. चमच्यानं वेलची चाचपून पाहिली आणि गळाला मासा लागावा तशी चमच्याला माशी लागली. घंटा दाबून पोऱ्याला बोलवलं आणि चमचा, म्हणजेच माशी, त्याच्या पुढ्यात धरली. 'अहो आश्चर्यम्' असा आविर्भाव आणून पोऱ्यानं माशीचं बरंच आणि बारीक निरीक्षण केलं आणि काहीसं स्वगत, काहीसं मला उद्देशून तो म्हणाला, 'एवढ्या काढल्या तरी एक राहिलीच!' 'साहेब, दुसरा कप आणतो' त्या आर्जवाला मी बळी पडलो नाही. कारण तोच कप पुन्हा दुसरा कप म्हणून सादर केला जाणार होता याची मला खात्री होती. मी चिडून तावातावाने बाहेर पडलो. तरीसुद्धा त्याने माझा पाठलाग करीत मला काउंटरपाशी गाठलेच. तो तोंड उघडायच्या आतच मी त्याला निक्षून सांगितलं. ''मला तुझं दूध नको!'' ''दुधाचं नाही बोलत साहेब. लक्ष्मीबाई आल्या तर काय सांगू?'' पोऱ्यानं लक्ष्मीबाईंची अडचण दूरदृष्टीनं जाणून विचारलं. ''तिला समोरच्या हॉटेलात पाठवून दे'' मी दुसरा विचार न करता सांगितलं.

समोरच्या हॉटेलातही मी दूधच मागवलं. पण साधं, वेलची न घातलेलं. अंगठ्याची जखम आंधळी झाली म्हणजे जशी वारंवार ठेच लागते तसं मनुष्य संशयी झाला म्हणजे त्याचं मन प्रत्येक ठिकाणी अडखळतं. येथील दूधही मी सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या दृष्टीनं तपासून पाहिलं. 'पांढऱ्या शुभ्र दुधात काळीकुट्ट माशी दिसायला सूक्ष्मदर्शक यंत्राची गरज भासली नाही. कप तसाच उचलला आणि मॅनेजरसाहेबांच्या टेबलावर नेऊन आदळला. मॅनेजरसाहेबांनी माझ्यासारखी शेकडो गिऱ्हाइकं पाहिली होती. हजारो माश्या पाहिल्या होत्या. अगदी शांतपणे ते म्हणाले, ''साहेब, हा धंदा आहे. दोन आण्याच्या दुधात माशी नाही येणार तर काय हत्ती? आणि दुसरं म्हणजे साहेब, माशी मेलेली आहे! तुम्ही एवढं घाबरायला नको होतंत. ती तुमचं एक थेंबसुद्धा दूध प्याली नसती.''

---

21. उपाहारगृहातील पोऱ्याला कशाचे आश्चर्य वाटले?

(1) लक्ष्मीचे आगमन होणार असल्याचे

(2) लेखकाच्या चिडल्याचे

(3) कपातील सर्व माशा काढताना एक माशी शिल्लक कशी राहिली याचे

(4) लक्ष्मीबाईंची अडचण दूर केल्याचे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**22.** लेखकाच्या मते लक्ष्मीची गाठभेट कोठे होऊ शकते ?

(1) कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री कोठेही (2) कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री झोपेत

(3) स्वगृही (4) उपाहारगृहात 'फॅमिली रूम' मध्ये

---

**23.** पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

"अंगठ्याची जखम आंधळी झाली म्हणजे जशी वारंवार ठेच लागते तसं मनुष्य संशयी झाला म्हणजे त्याचं मन प्रत्येक ठिकाणी अडखळतं."

(1) वाक्याच्या पूर्वार्धात अनुभव तर उत्तरार्धात त्याचा परिणाम दिसतो.

(2) वाक्याचा पूर्वार्ध बरोबर पण उत्तरार्ध चुकीचा.

(3) वाक्याच्या पूर्वार्धाचा उत्तरार्धाशी काही कार्यकारणभाव नाही.

(4) वाक्याचा पूर्वार्ध व उत्तरार्ध पूर्णपणे चुकीचा आहे.

---

**24.** कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री जागा असेल त्याला कशाचा लाभ होतो ? असे लेखकाला वाटते.

(1) बायकोचा (2) दुधाचा (3) लक्ष्मीचा (4) माशीचा

---

**25.** वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

(1) कोजागिरी पौर्णिमा (2) लक्ष्मीच्या शोधात

(3) माशीची करामत (4) गृहलक्ष्मीचा त्याग

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**26.** Choose the pair that would fill in the blanks in the following sentences :

(a) She looked ________ the stairs.

(b) They went ________ the house.

**Answer Options :**

(1) at, up (2) to, into (3) up, inside (4) towards, at

---

**27.** Identify the correctly framed questions.

(a) How long she is staying in India ?

(b) Has the fat woman been very clever ?

(c) How many gold ornaments she is wearing ?

**Answer Options :**

(1) (a) only (2) (b) only

(3) (a) and (b) only (4) (b) and (c) only

---

**28.** Which pair will fill in the blanks in the following sentences ?

(a) ________ those wet things out.

(b) I'll give you a ________ tonight.

**Answer Options :**

(1) Wriggle, ring (2) Wrinkle, ring (3) Wring, ring (4) Wrestle, ring

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

29. Orphanage is a home for orphans.

Infirmary is a home for ______

(1) babies (2) lunatics (3) old persons (4) beggars

30. You <u>ought to</u> reach there on time.

Identify the correct meaning of the modal underlined.

(1) Order (2) Necessity (3) Duty (4) Advice

31. Mary said to him gently, "I don't remember your old mother, what was she like ?" (Direct speech)

Indirect speech of this sentence will be :

(1) Mary said to him gently that she did not remember his old mother and inquired what she was like.

(2) Mary said to him gently that she do not remember his old mother and inquired what she is like.

(3) Mary said to him gently that I did not remember his old mother and inquired what does she like.

(4) Mary said to him gently that she does not remember his old mother and inquired what she would be like.

32. Hitler was a mad man. (Assertive)

Exclamatory form of the given sentence will be :

(1) Hitler was a very mad man!

(2) What a mad man Hitler was!

(3) How much mad a man was Hitler!

(4) Mad man was Hitler!



Teachingninja.in

33. (a) My house contains many specious rooms.

(b) Nobody was impressed with his specious arguments.

Identify the correct sentence.

(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct

(3) Both (a) and (b) are correct (4) Both (a) and (b) are incorrect

---

34. Which is the correct expression out of the alternatives ?

(1) A finger in every pie (2) A finger in every soup

(3) A finger in everything (4) A finger in every dish

---

35. Pick out the most appropriate phrase for the underlined word in the following sentence :

She welcomed him very <u>affectionately</u>.

(1) With open arms (2) With open doors

(3) With an open book (4) With open letter

---

36. Select the word which is synonym of the underlined word in the following sentence :

To be healthy one should <u>abstain</u> from smoking and alcoholism.

(1) Enjoy (2) Accept

(3) Not to indulge in (4) None of the above

---

37. Identify adjective clauses :

(a) The organisers invited entries that did not exceed 1000 words.

(b) Did you see the man who was asking for you ?

(c) I made the dress that I intend to wear.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (a), (b) and (c)

(3) (a) and (c) only (4) (b) and (c) only

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**38.** Choose the correct exclamatory sentences :

(a) What ? a lot you have bought!

(b) What a lot you have bought!

(c) What ! A lot you have bought ?

**Answer Options :**

(1) (a) only (2) (b) only

(3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

---

**39.** Choose the correct sentence/s :

(a) One student only came in late yesterday.

(b) He married her only for her money.

(c) I hardly know this girl.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (b) only (4) (b) and (c) only

---

**40.** That you have come pleases me.

The underlined group of words is an example of :

(1) Adjective clause (2) Adverb clause

(3) Noun clause (4) None of the above

---

**41.** Notwithstanding the resistance offered by him, he was arrested by the Police.

The meaning of the word 'Notwithstanding' here is :

(1) Inspite of (2) Because of (3) In view of (4) By dint of

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**42.** Put the correct verb in the blank.

"The rise and fall of the tide __________ due to lunar influence."

(1) are (2) is (3) are not (4) have

---

**43.** I was doubtful whether it was you (Affirmative).

The correct negative form of this sentence will be :

(1) I was not sure it is not you.

(2) I was not sure it was you.

(3) I was so sure it was you.

(4) I was so sure it was not you.

---

**44.** Choose the correct meaning of the phrase/idiom.

<u>To rule the roost.</u>

(1) To do a difficult job (2) To pass a critical stage

(3) To get ahead secretely (4) To dominate

---

**45.** Select the word which is antonym of the underlined word in the following sentence :

There is <u>dispute</u> going on about the exact meaning of the word 'Secularism'.

(1) Mutual agreement (2) Discussion

(3) Controversy (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**Question number 46 to 50 passage for comprehension :**

Dr. Ambedkar delivered this important address on the $101^{st}$ birth anniversary of Justice Ranade, one of India's foremost political and social thinkers. At the beginning of his address, Dr. Ambedkar discusses the role of man as a maker of history. According to him, the theory of Buckle that the history is created by Geography and Physics, and that of Marx that it is result of economic forces, both speak the half truth. They do not give any place to man. But Dr. Ambedkar asserts that man is a factor in the making of history and that environmental forces alone are not the makers of history.

Dr. Ambedkar further proceeds to discuss the tests of a great man as propounded by Carlyle the apostle of Hero Worship, and also of other political thinkers. After exhaustive discussion, he observes that sincerity and intellect the combination of which are necessary to make a man great. But these qualifications are not alone sufficient. A man possessed of these two qualities must be motivated by the dynamics of a social purpose and must act as a scavenger of society.

According to Dr. Ambedkar, Ranade was a great man by any standard. He wanted to vitalize the Hindu society to create social democracy. Ranade lived in times when social and religious customs, however unmoral, were regarded as sacrosanct. What appeared to Ranade to be shames and wrongs of the Hindu society, were considered by the people to be most sacred injunctions of their religion. Ranade wanted to vitalize the conscience of the Hindu society which became moribund as well as morbid. Ranade aimed to create a real social democracy, without which there could be no sure and stable politics. Dr. Ambedkar points out that Ranade's aim was to cleanse the old order and improve the moral tone of the Hindu society.

Concluding his address, Dr. Ambedkar cautions against despotism. He says, "Despotism does not cease to be despotism because it is elective. Nor does despotism become agreeable because the Despots belong to our own kindred..................The real guarantee against despotism is to confront it with the possibility of its dethronement .........................of its being superseded by a rival party."

---

**46.** Moral atonement of the Hindu society was wanted by _________.

(1) Dr. Ambedkar (2) Carlyle (3) Justice Ranade (4) Marx

---

**47.** Justice Ranade's greatness lies in his _________.

(1) desire to vitalize the Hindu society

(2) efforts to awaken sense of right and wrong in the Hindu society

(3) authority as a Justice

(4) Both (1) and (2)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

48. Justice Ranade wanted to ________ .
(a) bring reforms in the Hindu society
(b) to establish social democracy
(c) make the Hindu religion a great religion
(d) both (a) and (b)

**Answer Options :**
(1) (a) (2) (b) and (c) (3) (c) and (d) (4) (a) and (b)

---

49. The above passage discusses ________.
(a) various notions of history
(b) Justice Ranade as a great political and social thinker
(c) the Hindu society
(d) despotism

**Answer Options :**
(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (c) and (d) (4) (b) only

---

50. Select the most appropriate alternative for the following question.
The above passage is ________.
(1) an essay (2) a speech
(3) summary of a speech (4) None of the above

---

51. जागतिक वन्यजीव दिवस (WWD) जगभरात 3 मार्च 2016 रोजी साजरा करण्यात आला. वर्ष 2016 च्या WWD चा विषय ________ होता.
(1) वन्यजीवांचे भविष्य आपल्या हातात आहे.
(2) वन्यजीव हे निसर्गातील सौंदर्य आहे.
(3) भविष्य जतन करण्यासाठी वन्यजीवांचे जतन करा.
(4) वरीलपैकी काहीही नाही.

World Wildlife Day (WWD) was observed on 3rd March 2016 across the world. The theme of 2016 WWD was ________.
(1) The future of wildlife is in our hands
(2) Wildlife is nature's beauty
(3) Save wildlife to save future
(4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

52. जल संधारणासाठी महाराष्ट्र शासनासोबत पाणी फाऊंडेशन सामील झाले आहे. या फाऊंडेशनची सुरुवात __________ यांनी केली आहे.

(1) सलमान खान (2) आमिर खान

(3) नाना पाटेकर (4) अमिताभ बच्चन

Paani Foundation joined hands with Maharashtra government for water conservation. Paani foundation has been started by __________.

(1) Salman Khan (2) Aamir Khan

(3) Nana Patekar (4) Amitabh Bachhan

---

53. बिबेक डेब्रॉय समिती, जिने आपला अंतिम अहवाल जून 2015 मध्ये सादर केला तो __________ शी संबंधित आहे.

(1) विद्यापीठ अनुदान मंडळाची पुनर्रचना (2) वस्तू व सेवा कर

(3) रेल्वेची पुनर्रचना (4) नेट न्युट्रॅलिटी

Bibek Debroy Committee, which submitted its final report in June 2015, is related to __________.

(1) Restructuring of UGC (2) Goods and Service Tax

(3) Restructuring of the Railways (4) Net neutrality

---

54. खालीलपैकी कोणते विधान **चूकीचे** आहे ?

(a) महाराष्ट्र शासनाने 'शेतकरी अपघात विमा योजना' लागू केली आहे.

(b) ही योजना 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना' या नावाने ओळखली जाते.

(c) या योजनेनुसार प्रत्येक शेतकऱ्याला ₹ 5 लाखाचे विमा संरक्षण मिळणार आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) वरीलपैकी एकही नाही

Which one of the following statements is **false** ?

(a) The Government of Maharashtra has launched the 'Farmers Accident Insurance Scheme'.

(b) The Scheme is called as 'Gopinath Munde Farmers Accident Insurance Scheme'.

(c) Under the Scheme each farmer will get ₹ 5 lakh insurance cover.

**Answer options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

55. 'कोप 21' (COP 21) बाबत खालीलपैकी कोणते विधान **चूकीचे** आहे ?

(1) ही संयुक्त राष्ट्र संघटनेची पॅरीस येथे डिसेंबर 2015 मध्ये हवामान बदलासंबंधीची परिषद होती.

(2) ही जागतिक नेत्यांची व 190 पेक्षा जास्त राष्ट्रांच्या प्रतिनिधींची शिखर परिषद होती.

(3) किमान 55 राष्ट्रांनी झालेल्या करारास मंजूरी दिल्यानंतर तो अंमलात येणार आहे.

(4) कराराचे उद्दिष्ट जागतिक तापमान किमान 4 डिग्रीने सेल्सिअस थोपविण्याचे आहे.

Which of the following statements is **false** about 'COP 21' ?

(1) It was a United Nations climate change conference held in Paris in December 2015.

(2) It was a summit of world leaders and delegates of more than 190 nations.

(3) The agreement will come into force after ratification by at least 55 nations.

(4) The agreement aims to limit global warming by 4 degree Celsius.

---

56. भारतातील ________ हे पहिले राज्य आहे ज्याने पदवी पातळीपर्यंत लैंगिक शिक्षण सक्तीचे केले आहे.

(1) तमिळनाडू (2) तेलंगणा (3) छत्तीसगढ़ (4) महाराष्ट्र

________ has become the first state in the country to introduce compulsory gender education till the graduate level.

(1) Tamil Nadu (2) Telangana (3) Chhattisgarh (4) Maharashtra

---

57. 3 जानेवारी 2016 रोजी दक्षिण आशियाई फुटबॉल फेडरेशन कप (SAFF) ________ यांनी जिंकला.

(1) अफगाणिस्तान (2) पाकिस्तान (3) भारत (4) श्रीलंका

________ won the 'South Asian Football Federation Cup (SAFF) on January 3, 2016.

(1) Afghanistan (2) Pakistan (3) India (4) Sri Lanka

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

58. वंशपरंपरेने आईकडून मुलाकडे जाणाऱ्या रोगांना रोखण्यासाठी 'तीन पालक' बालकांस (Three-parent babies) 2015 मध्ये मान्यता देणारा जगातील खालीलपैकी पहिला देश कोणता ?

(1) अमेरिका (2) जर्मनी (3) फ्रान्स (4) ब्रिटन

Which of the following became the first country in the World in 2015 to give a nod to 'three-parent' babies a move aimed at preventing serious inherited diseases being passed on from mother to child.

(1) USA (2) Germany (3) France (4) Britain

---

59. अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी ई.जी.आय.एस. इंडिया कंसलटिंग इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे नाव निश्चित केले गेले आहे. ही कंपनी ________ देशातील आहे.

(1) भारत (2) फ्रांस (3) जपान (4) जर्मनी

The name of EGIS India Consulting Engineers Pvt. Ltd. has been finalised for the Chatrapati Shivaji memorial in Arabian Sea. The Company is based in ________ .

(1) India (2) France (3) Japan (4) Germany

---

60. खालील विधाने विचारात घ्या :

(a) मुंबई पोलीस आयुक्त अहमद जावेद यांची नुकतीच सौदी अरेबियात राजदूत म्हणून नेमणूक झाली आहे.

(b) मुंबईचे आणखी एक माजी पोलीस आयुक्त ज्युलिओ रिबेरो यांनी देखील सौदी अरेबियात भारताचे राजदूत म्हणून कार्य केले होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) बरोबर, (b) चूकीचे (2) विधान (b) बरोबर, (a) चूकीचे

(3) दोन्हीही विधाने बरोबर (4) दोन्हीही विधाने चूकीचे

Consider the following statements :

(a) Mumbai Police Commissioner Ahmed Javed has been appointed as the Ambassador to Saudi Arabia.

(b) Another former Mumbai Police Commissioner, Julio Ribeiro, had earlier served as India's Ambassador to Saudi Arabia.

**Answer options :**

(1) Statement (a) is correct, (b) is false (2) Statement (b) is correct, (a) is false

(3) Both the statements are correct (4) Both the statements are false

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

61. खालील विधाने विचारात घ्या :

(a) रेल्वे मंत्र्यांनी घोषित केले आहे की, कोकण रेल्वे मडगांव (Margao) (गोवा) येथे 'बोगदा तंत्रज्ञान संस्था' (Tunnel Technology Institute) स्थापन करणार आहे.

(b) सदरहू संस्थेस 'जॉर्ज फर्नांडीस बोगदा तंत्रज्ञान संस्था' या नावाने ओळखले जाईल.

(c) अशा प्रकारची संस्था देशातील पहिलीच असेल.

(d) 'द कोकण रेल्वे महामंडळ लि. (KRCL) 1990 मध्ये स्थापन झाले.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **चूकीचे** आहे/आहेत ?

(1) (a) (2) (b) (3) (c) आणि (d) (4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following statements :

(a) The Railway Minister announced that Konkan Railway will establish a Tunnel Technology Institute at Margao (Goa).

(b) The institute will be called as 'George Fernandis Institute of Tunnel Technology'.

(c) The institute will be the first of its kind in the nation.

(d) The Konkan Railway Corporation Ltd. was formed in 1990.

Which of the above statements is/are **false** ?

(1) (a) (2) (b) (3) (c) and (d) (4) None of the above

62. भारतीय हातमाग ब्रँड योजनेंतर्गत 'चेट्टीनाद' कॉटन साडीला भारतीय हातमाग ब्रँड टॅग देण्यात आला. ही साडी तिच्या खास डिझाईन आणि रचनेसाठी ओळखली जाते. ही __________ राज्यातील पारंपरिक साडी आहे.

(1) आंध्र प्रदेश (2) तमिळनाडू

(3) केरळ (4) कर्नाटक

Under the India Handloom Brand Scheme 'Chettinad' cotton saree got the Indian Handloom Brand tag for its unique design and identity. It is the traditional saree of __________ state.

(1) Andhra Pradesh (2) Tamil Nadu

(3) Kerala (4) Karnataka

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

63. अरुणाचल प्रदेशामध्ये घडलेल्या घटनांच्या संदर्भात पुढील विधानांचा विचार करा :

**विधान (A) :** राज्याच्या राज्यपालांनी केलेली राष्ट्रपती राजवटीची शिफारस न्यायालयीन चिकित्सेच्या कक्षेत येत नाही.

**कारण (R) :** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 361 नुसार राज्यपालांनी त्यांच्या कार्यकक्षेत राहून केलेल्या कृतीला कायदेशीर कारवाई पासून संरक्षण दिले गेले आहे.

(1) **(A)** आणि **(R)** दोन्ही सत्य असून **(R)** हा **(A)** चा योग्य खुलासा आहे.

(2) **(A)** आणि **(R)** दोन्ही सत्य असून **(R)** हा **(A)** चा योग्य खुलासा नाही.

(3) **(A)** अयोग्य आहे **(R)** योग्य आहे.

(4) **(A)** आणि **(R)** दोन्ही चुकीचे आहेत.

In the context of events unfolding in the Arunachal Pradesh, consider the following statements :

**Assertion (A) :** A state Governor's recommendation in relation to the imposition of President's rule cannot be scrutinised by a court of law.

**Reason (R) :** Article 361 of the Constitution gives the Governor protection from legal action for acts done in performance of his powers and duties.

(1) **(A)** and **(R)** both are true and **(R)** is correct explanation for **(A)**.

(2) **(A)** and **(R)** both are true and **(R)** is not correct explanation for **(A)**.

(3) **(A)** is incorrect **(R)** is correct.

(4) **(A)** and **(R)** both are incorrect.

---

64. खालील विधाने विचारात घ्या :

(a) 2 **सप्टेंबर** 2015 रोजी भारताने युनेस्को बरोबर देहरादून येथे 'नैसर्गिक वारसा संवर्धन' केन्द्र स्थापन करण्याबाबतच्या करारावर स्वाक्षरी केली.

(b) युनेस्कोने 2014 पर्यंत भारतातील 32 जागतिक वारसा स्थळांना मान्यता दिली आहे.

(c) भारतातील एकूण वारसा स्थळांपैकी 7 ही '**नैसर्गिक**' वारसा स्थळे आहेत

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) (2) (b) (3) (a) आणि (c) (4) वरील सर्व

Consider the following statements :

(a) India on Sept. 2, 2015 signed an agreement with UNESCO to establish a centre for conservation of 'natural' heritage sites at Dehradun.

(b) There are 32 World heritage sites in India that are recognised by UNESCO as of 2014.

(c) Out of total heritage sites in India, there are 7 natural heritage sites.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) (a) (2) (b) (3) (a) and (c) (4) All above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**65.** क्रिकेटपटू प्रणव धनावडेने दि. 5 जानेवारी 2016 रोजी शालेय क्रीडा स्पर्धेत 129 चौकार आणि 59 षटकार हाणून नवा विक्रम रचला. त्याने एकूण किती रन केले ?

(1) 909 (2) 1009 (3) 1109 (4) 1209

Cricketer Pranav Dhanavade established new record on 5th Jan. 2016 by hitting 129 Fours and 59 Sixes. How *many runs did* he score finally ?

(1) 909 (2) 1009 (3) 1109 (4) 1209

---

**66.** 2016-2017 अर्थसंकल्पांतर्गत कृषी कल्याण अधिभार सर्व सेवांवर आकारला जाईल. या अधिभाराचा दर ________ टक्के आहे.

(1) 0.5 (2) 1 (3) 1.5 (4) 2

Under the union budget 2016-2017, Krishi Kalyan Cess will be levied on all services. The percent of this cess is ________.

(1) 0.5 (2) 1 (3) 1.5 (4) 2

---

**67.** खालील विवरणावरून व्यक्ती ओळखा :

(a) विक्रम साराभाईंची पत्नी.

(b) 'दर्पण नृत्य अकादमीची' स्थापना केली.

(c) कॅप्टन लक्ष्मी सहगलची बहीण.

(d) पद्मश्री व पद्मभुषण पुरस्काराने सन्मानित.

**पर्यायी उत्तरे :**

(1) मल्लिका साराभाई (2) मृणालिनी साराभाई

(3) मालविका साराभाई (4) मंदाकिनी साराभाई

Name the person described below :

(a) Wife of Vikram Sarabhai.

(b) Established 'Darpan Dance Academy'.

(c) Sister of Captain Laxmi Sehgal.

(d) Recipient of Padmashri and Padma Bhushan.

**Answer options :**

(1) Mallika Sarabhai (2) Mrunalini Sarabhai

(3) Malvika Sarabhai (4) Mandakini Sarabhai

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**68.** महाराष्ट्र सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना जाहीर केली आहे. ही योजना ________ यांच्यासाठी आहे.

(1) आर्थिकदृष्ट्या मागास दलित विद्यार्थी

(2) आर्थिकदृष्ट्या मागास दलित स्त्रिया

(3) आर्थिकदृष्ट्या मागास दलित वृद्ध लोक

(4) आर्थिकदृष्ट्या मागास दलित उद्योजक

Maharashtra government has announced 'Bharat ratna Dr. Babasaheb Ambedkar Special Collective incentive scheme for ________ .

(1) The economically backward Dalit students

(2) The economically backward Dalit women

(3) The economically backward Dalit elderly people

(4) The economically backward Dalit entrepreneurs

---

**69.** कोणते देश 'जी-फोर' गटाशी संबंधित **नाहीत** ?

(a) जर्मनी (b) जपान (c) ब्राझील (d) भारत (e) फ्रांस

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) आणि (d) (3) (c) आणि (a) (4) (e)

Which countries do **not** belong to 'G - 4' group ?

(a) Germany (b) Japan (c) Brazil (d) India (e) France

**Answer options :**

(1) (a) (2) (b) and (d) (3) (c) and (a) (4) (e)

---

**70.** आर.के. लक्ष्मण यांच्या आत्मचरित्राचे नाव सांगा.

(1) द अन्‌कॉमन मॅन (2) द टनेल ऑफ टाईम

(3) द टाईम ऑफ कॉमन मॅन (4) द मालगुडी डेज

Name the autobiography of R.K. Laxman.

(1) The Uncommon Man (2) The Tunnel of Time

(3) The Time of Common Man (4) The Malgudi Days

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

71. खालीलपैकी कोणते विधान **चूकीचे** आहे ?

(a) 'शबरीमल' मंदीर केरळमध्ये आहे.

(b) या मंदिरात महिलांना प्रवेश करण्यास बंदी आहे.

(c) या मंदिरात केवळ 10 ते 50 वयोगटातील महिलांना प्रवेश करण्यास बंदी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) वरील एकही नाही

Which of the following statements is **incorrect** ?

(a) 'Shabarimal' temple is in Kerala.

(b) There is a ban on entrance to the ladies in this temple.

(c) There is a ban only on the entrance of women in the age group of 10 to 50 years in this temple.

**Answer options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) None of the above

---

72. महाराष्ट्र शासनाने एपीजे अब्दुल कलाम अमृत योजना मंजूर केली आहे. या योजनेचे उद्देश ________ आहे.

(1) आदिवासी मुलांमधील कुपोषण कमी करण्यासाठी गरोदर स्त्रियांसाठी 6 महिन्यांपर्यंत पोषण प्रदान करणे

(2) शाळेतील मुलांमधील कुपोषण कमी करणे

(3) लहान मुलींमधील कुपोषण कमी करणे

(4) वरीलपैकी काहीही नाही

Maharashtra government has approved APJ Abdul Kalam Amrut Yojana. The objective of this scheme is ________.

(1) To curb malnutrition among tribal children by providing nutrition to pregnant women for six months

(2) To curb malnutrition among school going children

(3) To curb malnutrition amongst girl children

(4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

73. केन्द्रीय मंत्रिमंडळाने नुकतेच प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत नव्याने तीन अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (AIIMS) ________, ________ व ________ येथे स्थापण्याचे ठरविले आहे.

(1) नागपूर, मंगलागिरी, कल्याणी (2) नागपूर, विजयवाडा, असनसोल

(3) पुणे, कडाप्पा, दुर्गापूर (4) नागपूर, नेल्लोर, मुर्शिदाबाद

Recently the Union Cabinet approved the setting up of three new All India Institutes of Medical Sciences (AIIMS) under Pradhan Mantri Swasthya Suraksha Yojna at ________, ________ and ________.

(1) Nagpur, Manglagiri, Kalyani (2) Nagpur, Vijaywada, Asansol

(3) Pune, Kadapa, Durgapur (4) Nagpur, Nellore, Murshidabad

---

74. 119 वे घटनादुरुस्ती विधेयक (100 वी घटनादुरुस्ती) जे 2015 मध्ये संसदेने मंजूर केले ते ________ शी संबंधीत आहे.

(1) वस्तू व सेवा कर

(2) राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग

(3) उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची वयोमर्यादा वाढविणे

(4) भारत-बांग्लादेश भू सीमा

The 119th Constitutional Amendment Bill (100th Constitutional Amendment) which was passed by the Parliament in 2015, is related to ________.

(1) Goods and Service Tax

(2) National Judicial Appointment Commission

(3) Increasing the age limit of High Court Judges

(4) India - Bangladesh Land Boundary

---

75. मंगेश पाडगांवकर यांनी लिहीलेले काव्यसंग्रह ________ आहेत.

(a) गझल (b) विदुषक (c) सलाम (d) उत्सव

(e) धारानृत्य (f) निसर्गवन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b), (c), (d), (e) (2) फक्त (a), (b), (c), (d), (f)

(3) फक्त (a), (b), (c), (e), (f) (4) फक्त (a), (b), (d), (e), (f)

The collection of poetry written by Mangesh Padgaonkar include :

(a) Gazal (b) Vidushak (c) Salam (d) Utsav

(e) Dharanrutya (f) Nisargvan

**Answer options :**

(1) Only (a), (b), (c), (d), (e) (2) Only (a), (b), (c), (d), (f)

(3) Only (a), (b), (c), (e), (f) (4) Only (a), (b), (d), (e), (f)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**76.** तर्कदृष्ट्या विसंगत पर्याय निवडा :

(1)  (2)  (3)  (4) 

Select the logically odd image from the group :

(1)  (2)  (3)  (4) 

---

**77.** A, B, C, D आणि E हे कुटुंब सदस्य आहेत. A ही B ची मुलगी आहे परंतु B हे A चे वडील नाहीत. D व E हे सर्वसाधारण जोडपे आहे. C हा D चा मुलगा आहे, जो A चा भाऊ आहे. E चे B शी नाते दर्शवणारा पर्याय निवडा :

(1) मुलगी

(2) सून

(3) सासू

(4) E चे लिंग माहीत नसल्याने निश्चित करता येत नाही

A, B, C, D and E are family members. A is daughter of B but B is not the father of A. D and E is a normal couple. C is the son of D, who is brother of A. Select the option that indicates how E is related to B :

(1) Daughter

(2) Daughter-in-law

(3) Mother-in-law

(4) Cannot be ascertained for lack of knowledge about E's sex


---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK




Teachingninja.in

78. सोबतच्या प्रतिमेतील विविध क्षेत्रे रंगवण्यासाठी लागणाऱ्या किमान रंगांची संख्या अशा रीतीने निवडा की कोणत्याही रेषेच्या दोन्ही अंगांना एकच रंग असणार नाही.



(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

Select the minimum number of colours that are necessary to colour different areas of the accompanying image so that the same colour is no where on both the sides of any line.



(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

---

79. सीताचा जन्म 22 नोव्हेंबरला; रेखा सीतापेक्षा 16 दिवसानी मोठी आहे. त्या वर्षी 14 नोव्हेंबर बालदिन बुधवारी होता, तर रेखाचा जन्म कोणत्या वारी झाला ?

(1) सोमवार (2) मंगळवार (3) बुधवार (4) गुरुवार

Seeta was born on 22nd November, Rekha is older than Seeta by 16 days. During that year, 14th November; Children's day was on Wednesday. On which day was Rekha born ?


(1) Monday (2) Tuesday (3) Wednesday (4) Thursday

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK


Teachingninja.in

80. प्रश्न चिन्हाच्या ठिकाणी येणारी संख्या शोधा :




(1) 406 (2) 407 (3) 408 (4) 409

Which number would replace the question mark ?




(1) 406 (2) 407 (3) 408 (4) 409

---

81. एक अप्रामाणिक दुकानदार, खरेदी किमतीत गहू विकत असल्याचा दावा करीत होता. परंतु तो किलोऐवजी 950 ग्रॅम वजनाचा माल देत होता, तर त्याच्या उत्पन्नाची टक्केवारी किती ?

(1) 5.26 (2) 6.26 (3) 5.00 (4) 4.26

A dishonest shopkeeper professes that he sells the wheat at its cost price. But he uses a false weight of 950 gms for a kg; then his gain is ________%.

(1) 5.26 (2) 6.26 (3) 5.00 (4) 4.26


---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.


teachingninja.in
Teachingninja.in

82. चौरस पूर्ण करण्यासाठी तर्कसंगत पर्याय निवडा :



(1)  (2)  (3)  (4) 

Select the logical option for completing the square :




(1)  (2)  (3)  (4) 







Teachingninja.in

**83.** खालील मालिकेतील पुढील आकृती कोणती ?

**प्रश्न आकृत्या :**




**उत्तर आकृत्या :**




(1)  (2)  (3)  (4) 

Find the next figure ?

**Problem Figures :**



**Answer Figures :**

(1)  (2)  (3)  (4) 

---

**84.** खालील आकृतीत ताऱ्याच्या (✡) ठिकाणी कोणता अंक येईल ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 43 | 83 | 57 | 61 | 74 |
| 40 | 26 | 4 | 13 | |
| 14 | 22 | 9 | | |
| 8 | 13 | | | |
| ✡ | | | | |

(1) 6 (2) 21 (3) 5 (4) 15

What will be the number in place of the star (✡) ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 43 | 83 | 57 | 61 | 74 |
| 40 | 26 | 4 | 13 | |
| 14 | 22 | 9 | | |
| 8 | 13 | | | |
| ✡ | | | | |

(1) 6 (2) 21 (3) 5 (4) 15

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**85.** 1, 2, 3, 4, 5, 6 या सहा अंकापासून कोणत्याही अंकाची पुनरावृत्ती न करता किती वेगवेगळ्या चार अंकी संख्या तयार होतील ? त्यातील किती संख्या या 4000 पेक्षा मोठ्या असतील ?


(1) 270, 120 (2) 300, 140 (3) 360, 160 (4) 360, 180

How many four digit numbers can be formed without repeating a digit from 1, 2, 3, 4, 5, 6 ? How many of these will be greater than 4000 ?

(1) 270, 120 (2) 300, 140 (3) 360, 160 (4) 360, 180


---

**86.** सोबतच्या प्रतिमेत विशिष्ट पद्धतीने मांडलेले घनाकार दाखवलेले आहेत. घनांची तीन वा अधिक पृष्ठे जोडल्या गेलेल्या घनांकारांची संख्या दाखवणारा पर्याय निवडा :



(1) 8 (2) 10 (3) 12 (4) 14

The accompanying figure is showing the blocks arranged in a particular order. Select the option indicating the number of blocks that are joined by three or more surfaces of other blocks :




(1) 8 (2) 10 (3) 12 (4) 14

---





कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in


87. प्रतिमा A समाविष्ट करणारा पर्याय निवडा :







A

(1)  (2)  (3)  (4) 

Select the option in which image A is embedded :



A

(1)  (2)  (3)  (4) 

---

88. प्रश्नचिन्हाऐवजी ठेवण्यासाठी उचित गट निवडा :

YVS, URO, QNK, MJG, ?

(1) IFE (2) IFC (3) IGE (4) LJG

Select the appropriate group for replacing the question mark.

YVS, URO, QNK, MJG, ?

(1) IFE (2) IFC (3) IGE (4) LJG

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

89. जर a : b = 2 : 3, b : c = 5 : 6 आणि c : d = 2 : 1 तर मग a : b : c : d आणि a : d काढा ?

(1) 10 : 11 : 12 : 13 आणि 10 : 13 (2) 9 : 10 : 15 : 13 आणि 9 : 13

(3) 10 : 15 : 18 : 9 आणि 10 : 9 (4) 11 : 12 : 13 : 14 आणि 11 : 14

If a : b = 2 : 3, b : c = 5 : 6 and c : d = 2 : 1 then find out a : b : c : d and a : d ?

(1) 10 : 11 : 12 : 13 and 10 : 13 (2) 9 : 10 : 15 : 13 and 9 : 13

(3) 10 : 15 : 18 : 9 and 10 : 9 (4) 11 : 12 : 13 : 14 and 11 : 14

---

90. अनिताने अमितकडे निर्देश करत म्हटले की ''ह्याची आई माझ्या आईची एकुलती मुलगी आहे.'' तर अनिता अमितची कोण ?

(1) आई (2) मुलगी (3) बहीण (4) आजी

Pointing to Amit Anita said, "His mother is the only daughter of my mother". How is Anita related to Amit ?

(1) Mother (2) Daughter (3) Sister (4) Grandmother

---

91. सकाळी 9.00 वाजल्यापासून ते रात्री 9.00 पर्यंत घड्याळात तासकाटा व मिनिटकाटा किती वेळेला 90° चा कोन करतील ?

(1) 24 वेळेला (2) 23 वेळेला (3) 25 वेळेला (4) 12 वेळेला

How many times hour hand and minute hand will form 90° angle from 9.00 a.m. to 9.00 p.m. in the clock ?


(1) 24 times (2) 23 times (3) 25 times (4) 12 times



---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in


92. प्रतिमा मालिकेच्या 5 व्या जागेसाठी उचित प्रतिमा निवडा :



(1)  (2)  (3)  (4) 

Select an appropriate image for the 5th place in the following image series :



(1)  (2)  (3)  (4) 

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

93. एक वस्तू ₹ 150 ला विकल्यास खरेदीच्या $\frac{1}{6}$ इतका तोटा होतो तर वस्तूची खरेदीची किंमत किती ?

(1) ₹ 160 (2) ₹ 165 (3) ₹ 170 (4) ₹ 180

Selling item for ₹ 150 results in $\frac{1}{6}^{th}$ loss on purchase price, then what is the purchase price of the item ?

(1) ₹ 160 (2) ₹ 165 (3) ₹ 170 (4) ₹ 180

---

94. अनू आणि जानू वर्तुळाकार मार्गावरून एकसमान गतीने चालतात आणि अनूच्या गतीचे जानूच्या गतीशी असलेले गुणोत्तर 2 : 3 आहे. या मार्गाच्या बाह्य कडेने K, L, M, N, O, P, Q आणि R ही नामनिर्देशने असलेली आठ झाडे समान अंतरावर आहेत. जर अनू K पासून सुरुवात करत असेल आणि जानू L पासून सुरुवात करत असेल तर ते दोघे एकाच वेळी ज्या झाडापाशी असतील त्याची निवड करा.

(1) P (2) M (3) Q (4) N

Anu and Janu are walking on the circular track with the uniform speed and ratio of Anu's speed to that of Janu's is 2 : 3. Along the periphery of this track there are eight trees labelled as K, L, M, N, O, P, Q and R at equal distances. If Anu starts from tree K and Janu starts from tree L at the same instance select the tree where they will be meeting at the same time.


(1) P (2) M (3) Q (4) N


---


कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK


Teachingninja.in


95. पुढे दाखवल्यानुसार कागदाला घड्या घातल्या व गडद आकारांने दाखवल्यानुसार त्याला छिद्रे केली. त्रिकोणी घडी उलट प्रक्रियेने उलगडल्यानंतर मिळणारा पर्याय निवडा :




(1) 

(2) 


(3) 


(4) 


Paper sheet is folded as shown below and punched as shown by dark patches. Select the option that is obtained by unfolding the triangular fold using the reverse process :



(1) 

(2) 

(3) 

(4) 

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in


**96.** अमर, अकबर आणि ॲन्थनी यांनी 1 जानेवारीला भागीदारीत एक व्यवसाय सुरु केला. अमरने 1 जानेवारीला ₹ 3000 गुंतवले. अकबर व ॲन्थनीने अनुक्रमे ₹ 5000 आणि ₹ 8000, अनुक्रमे 1 जून व 1 सप्टेंबरला गुंतवले. वर्षाच्या शेवटी त्यांना ₹ 4120 इतका फायदा झाला असल्यास ॲन्थनीला त्याच्या गुंतवणूकीवर किती लाभांश मिळेल ?





(1) ₹ 1200 (2) ₹ 1280 (3) ₹ 1300 (4) ₹ 1380

Amar, Akabar and Anthony form a partnership firm on 1st January. Amar invests his ₹ 3000 on 1st January. Akabar and Anthony however invest ₹ 5000 and ₹ 8000 on 1st June and 1st September respectively. If the profit at the end of the year is ₹ 4120, how much amount will Anthony get as his share of profit ?


(1) ₹ 1200 (2) ₹ 1280 (3) ₹ 1300 (4) ₹ 1380





**97.** चौरस पूर्ण करण्यासाठी तर्कसंगत पर्याय निवडा.



(1)  (2)  (3)  (4) 

Select the logical option for completing the square.



(1)  (2)  (3)  (4) 

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

98. दीपने त्याचे $\frac{1}{3}$ कार्य पाच दिवसात पूर्ण केले. त्याने त्याचे शिल्लक राहीलेले कार्य सहा दिवसात वसंतच्या साहाय्याने पूर्ण केले. जर वसंतला त्या कामाचे वेतन ₹ 360 मिळाले; तर दीपला त्याच्या कामाचे वेतन किती मिळेल ?

(1) ₹ 1000 (2) ₹ 990 (3) ₹ 900 (4) ₹ 720

Dip finished his $\frac{1}{3}^{rd}$ of the work in five days. He finished the remaining work in six days, with the help of Vasanta. If Vasanta obtained ₹ 360 as wages; find the wages Dip obtained ?

(1) ₹ 1000 (2) ₹ 990 (3) ₹ 900 (4) ₹ 720

---

99. पुढील अंकमालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता अंक येईल ?

43, 65, 56, 78, 69, ?

(1) 91 (2) 81 (3) 89 (4) 92

What figure should come in place of the question mark in the following number series ?

43, 65, 56, 78, 69, ?

(1) 91 (2) 81 (3) 89 (4) 92

---

100. रंगारी A एक काम 10 दिवसात पूर्ण करतो, वेळ नसल्याने त्याने B ला मदतीला म्हणून घेतले. B तेच काम 30 दिवसात पूर्ण करतो. त्या दोघांनी मिळून काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. दोघे मिळून किती दिवसात ते काम संपवतील ?

(1) $7\frac{1}{2}$ (2) $2\frac{3}{5}$ (3) $6\frac{9}{5}$ (4) $4\frac{5}{2}$

Painter A can complete the work in 10 days, but he has no time, so he takes the assistance of B. B can complete the same work in 30 days. Now they decide to work together. In how many days will they complete that work ?

(1) $7\frac{1}{2}$ (2) $2\frac{3}{5}$ (3) $6\frac{9}{5}$ (4) $4\frac{5}{2}$

---

- o 0 o -

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

SEAL

Teachingninja.in